मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पंतप्रधान मोदींवरील विश्वास अन् विकास हेच भाजपाच्या विजयाचे सूत्र!

## तीन राज्यातील विजयाचा पिंपरी-चिंचवडमध्ये आनंदोत्सव

**पिंपरी ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

देशवासीयांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असलेला विश्वास आणि केलेला विकास हेच भाजपाच्या विजयाचे सूत्र आहे. मोदींवर सर्वसामान्य जनतेने पुन्हा एकदा विश्वास दाखवत भाजपाला राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड या तीन ठिकाणी झालेल्या निवडणुकांमध्ये दमदार विजय मिळवून दिला. आगामी लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील भाजपाचे ४५ हून अधिक आणि देशातील ३५० हून अधिक उमेदवार निवडून येतील. विजयाची ही मालिका कायम राहील, असा विश्वास भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला. राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड या तीन राज्यामध्ये झालेली निवडणुकीचा निकाल हाती आला. यामध्ये



भाजपाचे दमदार कामगिरी करीत बहुमत मिळवले आहे. यानिमित्त पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे मोरवाडी येथील मध्यवर्ती जनसंपर्क कार्यलयात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. त्यावेळी शहराध्यक्ष जगताप बोलत होते. यावेळी, भाजपा वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस विलास मडिगेरी, संजय मगोडेकर, अजय पाताडे, नामदेव ढाके, पिंपरी विधानसभा अध्यक्ष अमित गोरखे, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे,युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, प्रदेश सचिव कविता हिंगे, उपाध्यक्ष आशा काळे, सचिव राजश्री रायभाय, अभिजित बोरसे, समीर जावळकर, उपाध्यक्ष बिभीषण चौधरी, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश सरचिटणीस धनराज बिरदा, महिला मोर्चा सरचिटणीस वैशाली खाड्ये, माजी नगरसेवक सागर आंगोळकर, शारदा सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते शेखर चिंचवडे, गोपाळ मंडल, जयेश चौधरी, सुधीर साळुंखे, प्रसाद कस्पटे, वीणा सोनवलकर, दीपक भंडारी, राजन गुंजाळ, खेमराज काळे, गणेश ढाकणे, चैतन्य देशपांडे, बेटी बचाव बेटी पढाव प्रकोष्ठच्या प्रीती कामतिकर, माजी नगरसेविका अश्विनी बोबडे, सदस्या सुनीता खराडे, प्रज्ञा हीतनाळेकर, सीमा चव्हाण, संतोष भालेराव आदी उपस्थित होते. शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, आगामी काळात लोकसभेच्या निवडणुका होणार असल्याने या निवडणुकीला महत्व प्राप्त झाले होते. विरोधकांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती.

> “देशातील नागरिकांनी भारतीय जनता पक्षाच्या विकासात्मक धोरणाला पसंती दिली असून, आगामी लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपा मोठा विजय प्राप्त करेल. मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड या राज्यात भाजपाने बहुमत मिळवले. तेलंगणा राज्यामध्येही भारतीय जनता पार्टीचा मतदानाचा टक्का वाढून तेथील भाजपाच्या मते वाढलेली आहेत. तसेच, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे अचूक निवडणूक व्यवस्थापन हा या निवडणुकीतील विजयाचा पाया ठरला आहे. विकासाच्या मुद्यांवर आणि मोदींच्या नेतृत्त्वावर मतदारांचा विश्वास आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत ३५० हून जास्त उमेदवार निवडणून येतील आणि नरेंद्र मोदी पंतप्रधानपदाची पुन्हा शपथ घेतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सर्व भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. तसेच, त्या-त्या राज्यातील सूज्ञ मतदारांचे आभार व्यक्त करतो.
>
> - **शंकर जगताप**, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त २५०० गाईंना चारा वाटप

## वायसीएम हॉस्पिटल मधील रुग्णांना फळ वाटप करत वाढदिवस साजरा

**मोशी**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

भोसरी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार महेश लांडगे यांचा वाढदिवस मतदार संघातील प्रभागांमध्ये विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. त्यातच कृष्णा नगर मधील सामाजिक महिला कार्यकर्त्या कीर्ती जाधव आणि मारुती गणपत जाधव यांच्यावतीने २५०० गाईंना चारा वाटप व वाय. सी.एम हॉस्पिटल मधील रुग्णांना फळ वाटप करत वाढदिवस साजरा केला. महेश दादांच्या सलोख्याशी व दादांची गोरक्षक म्हणून एक ओळख निर्माण झालेली असताना ग्रामीण भागातील गाई, बैल, घोडा यांच्याशी जिव्हाळ्याचा



संबंध आहे. तसेच गोमातेचे रक्षण. दादांच्या विचारांशी अनुसरून एक स्तुत्य उपक्रम घेण्यात आला. यावेळी महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन दक्षता समिती प्रमुख गोरक्षक श्री. शिवशंकर स्वामी हे देखील आवर्जून उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत वाय.सी.एम हॉस्पिटल मधील रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. त्यासाठी प्रमुख उपस्थित म्हणून वाय.सी.एम हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉक्टर राजेंद्र वाबळे उपस्थित होते.

# इंद्रायणी नदी संवर्धनासाठी 'रेकॉर्ड ब्रेक' सायकल रॅली!

## आ. महेश लांडगे यांची संकल्पना; ३० हजार सायकलपटूंचा सहभाग



**मोशी**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** इंद्रायणी नदी स्वच्छता आणि संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आयोजित केलेल्या 'रिव्हर सायक्लोथॉन-२०२३' मध्ये तब्बल ३० हजार ३७० हून अधिक सायकलपटूंनी सहभाग घेतला. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून प्रतिवर्षी 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' चे आयोजन केले जाते. या उपक्रमाचे हे सहावे वर्ष आहे. ''आपली इंद्रायणी नदी सर्वांनी प्रदूषित न करता स्वच्छ ठेवावी'' हा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला. अविरत श्रमदान, सायकल मित्र, महेश दादा स्पोर्ट्स फाऊंडेशन, पिंपरी- चिंचवड नगरपालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस विभाग आणि इतर पर्यावरण प्रेमी संस्थांनी पुढाकार घेतला. पुणे, पिंपरी-चिंचवडसह तब्बल ३० हजार ३७० हून अधिक सायकलपटूंनी या सायकल रॅलीमध्ये सहभाग घेतला. यावेळी 'रिव्हर सायक्लोथॉन टीम'ने 'लाँगेस्ट लाईन ऑफ बायसिकल्स स्टॅटिक्स'च्या विक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद केली. त्याचे प्रमाणपत्र यावेळी प्रदान करण्यात आले. महापालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, कुस्तीपटू नरसिंह यादव यांच्यासह महापालिका, पोलीस अधिकारी, विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, एव्हढ्या सकाळी नागरिक नदी स्वच्छता देण्यासाठी मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन सायलिंगसाठी काम करीत आहे. प्रशासनाला यावर्षी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय असे दोन पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये 'रिव्हर सायक्लोथॉन'चे योगदान महत्वाचे आहे. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे म्हणाले की, पर्यावरण संवर्धनासाठी रिव्हर सायक्लॉथॉनची संकल्पना प्रत्यक्षात आणणारे आमदार महेश लांडगे यांचे अभिनंदन करतो. सर्व संस्था, स्वयंसेवी संस्था आणि पर्यावरणप्रेमी व्यक्तींमुळे पिंपरी-चिंचवडचे नाव जगभरात करणारे आणि वर्ल्ड रेकॉर्ड करणाऱ्या सायकलपटूंचे कौतूक करतो. आरोग्यदायी जीवनासाठी सायकलपटूंनी सातत्य ठेवावे. ५, १५ आणि १५ किलोमीटर स्पर्धा होत आहेत. पुढील वर्षी ३५ किमी लांब सायकल रॅली स्पर्धा करावी, अशी अपेक्षाही चौबे यांनी व्यक्त केली. नदी स्वच्छता आणि संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आयोजित केलेल्या सायकल रॅलीमध्ये सायकलपटूंनी 'रेकॉर्ड ब्रेक' प्रतिसाद दिला. महाराष्ट्रातील ही सर्वात मोठी सायकल रॅली ठरली आहे. विशेष म्हणजे, 'रिव्हर सायक्लोथॉन टीम' ने 'लाँगेस्ट लाईन ऑफ बायसिकल्स स्टॅटिक्स'च्या विक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद केली आहे. सर्व सायकलपटू, पर्यावरण प्रेमींनी दिलेल्या लक्षवेधी प्रतिसादाबद्दल आभार व्यक्त करतो, अशा भावना मुख्य समन्वयक डॉ. निलेश लोंढे यांनी व्यक्त केल्या आहेत. रिव्हर सायक्लोथॉनच्या निमित्ताने आयोजित झुंबा डान्स् कार्यक्रमात आमदार महेश लांडगे यांनी 'पैलवान आला गं ' गाण्यावर ठेका धरला. तसेच, आशिष आहेर यांनी आमदार लांडगे यांनी काढलेले 'स्केच' भेट देण्यात आले. सलग ३३ वर्षे आळंदी ते लांडेवाडी सायकल वारी करणारे आणि ७० वर्षांपासून सायकल चालवणारे ८१ वर्षीय अशोक विष्णूपंत बेलापूरकर यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. सलग ६६ दिवस महाराष्ट्रामध्ये साडेसहा हजार किलोमीटरचा प्रवास करुन गडकिल्ले सर करणारे सायकल मित्रचे प्रकाश पाटील यांचाही गौरव करण्यात आला. श्री. घुले यांनी स्वच्छतेचे महत्त्व व्यक्त केले.

> **"** नदी स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाची जनजागृती करण्यासाठी अविरत श्रमदान आणि सायकल मित्र संघटनेच्या पुढाकाराने 'रिव्हर सायक्लोथॉन'चे आयोजित करण्यात येते. जर्मनीचे रेकॉर्ड तोडण्यासाठी ६० देशांनी प्रयत्न केले. मात्र, भारताने हे रेकॉर्ड मोडले. या स्पर्धेच्या माध्यमातून पर्यावरण रक्षण आणि फिटनेसचा संदेश देण्यात येत आहे. या रॅलीला ऐतिहासिक प्रतिसाद दिला. याबद्दल सायकलपटू आणि पर्यावरण प्रेमींचे आभार व्यक्त करतो.
>
> – **महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पिंपरीत : ट्रेलर चोरताना रंगेहाथ पकडलं!

## चालकाचा मारहाणीत मृत्यू; गुंडा विरोधी पथकाने तिघांना केलं जेरबंद

**पिंपरी-चिंचवड ।**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ट्रेलर चालकाची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी गुंडाविरोधी पथकाने अवघ्या ४८ तासांमध्ये तीन आरोपींना जेरबंद केलं आहे. अमोल विकास पवार असं हत्या करण्यात आलेल्या ट्रेलर चालकाचे नाव आहे. तो इतर चालकांचा ट्रेलर चोरत असताना झालेल्या मारहाणी त्याचा मृत्यू झाला होता. आरोपींनी मुंबईच्या दिशेने पळ काढला होता. त्यांना अवघ्या काही तासातच अटक करण्यात आली आहे. दशरथ उर्फ सोनू जयराम अडसूळ, विष्णू अंगद राऊत आणि बळीराम वसंत जमदाडे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. हे सर्व जण ट्रेलर चालक आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी अमोल पवारचा मृतदेह नग्न अवस्थेत म्हाळुंगे पोलीस ठाण्याच्या परिसरात आढळला, त्याची हत्या झाल्याचं निष्पन्न झालं. याप्रकरणाचा तपास सुरू असताना गुंडाविरुद्ध पथकाचे पोलीस निरीक्षक हरीश माने हे त्यांच्या टीमसह आरोपींचा शोध घेत होते. अमोलच्या हातावर बंजारा असे गोंदलेले आढळले. निगडी पोलीस ठाण्यात अमोल बेपत्ता असल्याची तक्रार देण्यात आली होती. तक्रारदार रोहिदास राजेंद्र चव्हाण यांच्याकडे यासंबंधीची चौकशी आणि बंजारा गोंदलेला संबंधी सांगितलं असता तो बेपत्ता अमोल विकास पवार असल्याचं समोर आलं. तपासा दरम्यान गुंडा विरोधी पथकाला एक सीसीटीव्ही आढळला. मयत अमोल हा ट्रेलरमध्ये शिरतो आणि तो ट्रेलर चोरून नेण्यासाठी प्रयत्न करतो. ही बाब आरोपी ट्रेलर चालकांना समजताच त्यांच्यात आणि अमोलमध्ये झटापट झाली. झटापटीमध्ये गंभीर जखमी होऊन अमोल चा मृत्यू झाला. अमोलचा मृतदेह जवळच्या पटांगणात टाकून देण्यात आला, त्यानंतर तिघेही मुंबईच्या दिशेने ट्रेलर घेऊन पसार झाले. मात्र, अवघ्या काही तासातच गुंडाविरोधी पथकाने त्यांना बेड्या ठोकल्या आहेत.

# प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना न केल्याने शापूरजी पालनजी कंपनीला दंड

## महापालिकेडून एक लाख रुपयांचा ठोठावण्यात आला दंड

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** बांधकामातून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना न केल्याप्रकरणी शापूरजी पालनजी या कंपनीला महापालिकेडून एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाकडून ही कारवाई करण्यात आली आहे. शापूर्जी पालमजी ग्रुपच्या वतीने शेवाळेवाडी येथे जॉयविले या गृहप्रकल्पाचे काम सुरू आहे. शहरातील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर बांधकाम व्यावसायिकांनी प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी सूचना महापालिका प्रशासनाकडून करण्यात




आली आहे. मात्र या गृहप्रकल्पाचे काम करताना उपाययोजनांचे पालन केले जात नसल्याची तक्रार स्थानिक नागरिक आणि भाजपाचे उपाध्यक्ष राहुल शेवाळे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली होती. या प्रकल्पाचे बांधकाम थांबविण्यात यावे, अशी मागणीही प्रशासनाकडे करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाकडून बांधकाम प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. त्यावेळी प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आले नसल्यामुळे एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर राडारोडा टाकणाऱ्या ४८ नागरिकांवरही कारवाई करण्यात आली. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम परिमंडळ चारचे उपायुक्त प्रसाद काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका सहाय्यक आयुक्त बाळासाहेब ढवळे पाटील, वरीष्ठ आरोग्य निरीक्षक संजय धनवट, आरोग्य निरीक्षक विकास मोरे, मुकादम दत्ता पोळ आणि रवी क्षीरसागर यांच्या पथकाने ही कारवाई केली. बांधकामातून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना न केल्याप्रकरणी शापूरजी पालनजी या कंपनीला महापालिकेडून एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाकडून ही कारवाई करण्यात आली आहे. शापूर्जी पालमजी ग्रुपच्या वतीने शेवाळेवाडी येथे जॉयविले या गृहप्रकल्पाचे काम सुरू आहे.

> **एक लाख रुपयांचा दंड**
>
> **» प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आले नसल्यामुळे एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर राडारोडा टाकणाऱ्या ४८ नागरिकांवरही कारवाई करण्यात आली. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम परिमंडळ चारचे उपायुक्त प्रसाद काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका सहाय्यक आयुक्त बाळासाहेब ढवळे पाटील, वरीष्ठ आरोग्य निरीक्षक संजय धनवट, आरोग्य निरीक्षक विकास मोरे, मुकादम दत्ता पोळ आणि रवी क्षीरसागर यांच्या पथकाने ही कारवाई केली.**

# मेट्रोच्या कामाला वेग; ८० टक्के खांबांची उभारणी

## पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड या विशेष कंपनीची स्थापना

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** हिंजवडीच्या माहिती तंत्रज्ञान (आयटी) केंद्राला शिवाजीनगरच्या मध्यवर्ती केंद्राशी जोडणाऱ्या पुणेरी मेट्रोच्या मार्गिका तीन प्रकल्पाच्या कामाने चांगलाच वेग पकडला आहे. या मार्गावरील ५ हजार सेगमेंटची उभारणी पूर्ण करण्यात आली आहे. या मार्गावरील ८० टक्के खांबाची उभारणी आता पूर्ण झालेली आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील मेट्रो मार्गिका



तीनचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) तर्फे सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर टाटा समूहाने हाती घेतले आहे. त्याच्या कार्यान्वयासाठी पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड या विशेष कंपनीची स्थापना करण्यात आलेली आहे. पुणेरी मेट्रोच्या मार्गिका तीनच्या दोन हजार सेगमेंटची उभारणी २४ एप्रिलला पूर्ण झाली होती. त्यानंतर सात महिन्यांच्या कालावधीत आणखी तब्बल तीन हजार सेगमेंट उभे करण्यात आले आहेत. प्रत्यक्ष काम सुरू झाल्यापासून १६ महिन्यांत पाच हजार सेगमेंटच्या उभारणीचा टप्पा पूर्ण करण्यात आला आहे. याबाबत पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आलोक कपूर म्हणाले की, प्रकल्पाचे काम वेगाने आणि पूर्ण क्षमतेने सुरू आहे. त्यामुळे १६ महिन्यांत पाच हजार सेगमेंटची उभारणी पूर्ण झाली आहे. तसेच काम सुरू झाल्यापासून केवळ दीड वर्षाच्या कालावधीत ८० टक्के खांब उभारणी पूर्ण करण्याचा टप्पा गाठण्यात आम्हाला यश मिळाले आहे.हिंजवडीच्या माहिती तंत्रज्ञान (आयटी) केंद्राला शिवाजीनगरच्या मध्यवर्ती केंद्राशी जोडणाऱ्या पुणेरी मेट्रोच्या मार्गिका तीन प्रकल्पाच्या कामाने चांगलाच वेग पकडला आहे. या मार्गावरील ५ हजार सेगमेंटची उभारणी पूर्ण करण्यात आली आहे. या मार्गावरील ८० टक्के खांबाची उभारणी आता पूर्ण झालेली आहे.

> **“ हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील मेट्रोच्या उभारणीमुळे सुलभ, वेगवान व स्वस्त सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम सुरू आहे.**
>
> **- आलोक कपूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड**

# महिला कैद्यांसाठी देशातील पहिले खुले कारागृह

## कारागृहातील वसाहती बांधण्यास ११ कोटी रुपयांचा निधी

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** गंभीर गुन्ह्यात शिक्षा सुनावलेल्या महिला कैद्यांसाठी देशातील पहिले खुले कारागृह येरवडा कारागृहाच्या आवारात साकारण्यात येणार आहे. गेले काही वर्षांपासून महिलांसाठी खुले कारागृह साकारण्याचा प्रस्ताव निधीअभावी रखडला होता. गृहविभागाने खुल्या कारागृहातील वसाहती बांधण्यास ११ कोटी रुपयांचा निधी नुकताच मंजूर केला आहे. निधी मंजूर झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तातडीने कारागृहातील पायाभूत सुविधा निर्मितीचे काम मार्गी लावण्यात येणार असून, वर्षभरात महिलांसाठी खुले कारागृह उभे राहील. गंभीर गुन्ह्यात शिक्षा सुनावलेल्या कैद्यांची कारागृहात वर्तणूक विचारात घेऊन त्यांची रवानगी खुल्या कारागृहात करण्यात येते. खुले कारागृह संकल्पना कारागृहापेक्षा वेगळी आहे. कारागृहातील कैदी खुल्या कारागृहाच्या आवारातील जागेत शेती करतात. तेथे त्यांच्या वसाहती बांधल्या जातात. सकाळी नियमित हजेरी घेतली जाते. खुल्या कारागृहात बंदोबस्त नसतो. शिक्षा सुनावलेल्या कैद्यांना खुल्या कारागृहात ठेवण्यात येते. खुल्या कारागृहात रवानगी करण्यापूर्वी कैद्याची कारागृहातील वर्तणूक विचारात घेतली जाते, अशी माहिती कारागृहातील अधिकाऱ्यांनी दिली.



येरवडा कारागृह देशातील सर्वात मोठे कारागृह म्हणून ओळखले जाते. येरवडा कारागृहाचा परिसर शेकडो एकरांवर आहे. महिलांसाठी स्वतंत्र कारागृह आहे. मात्र, महिलांसाठी खुले कारागृहाची सुविधा नव्हती. पुरुष कैद्यांसाठी खुले कारागृह आहे. येरवडा परिसरात महिलांसाठी खुले कारागृह बांधण्याची घोषणा तत्कालिन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी केली होती. १५ ऑगस्ट २०१० रोजी खुल्या कारागृहाचे भूमिपूजन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर निधीअभावी या कारागृहाच्या आवारातील वसाहती बांधण्याचा प्रस्ताव रखडला होता. गृहविभागाने महिलांसाठी खुल्या कारागृहाच्या आवारातील पायाभूत सुविधांसाठी ११ कोटी रुपयांचा निधी नुकताच मंजूर केला. गृहविभागाने निधी मंजूर केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून महिलांसाठीच्या खुल्या कारागृहातील वसाहती बांधण्याचे काम तातडीने सुरू करण्यात येईल. साधारणपणे वर्षभरात महिलांसाठी असलेले देशातील पहिले खुले कारागृह उभे करण्यात येईल, असे कारागृह अधिकाऱ्यांनी नमूद केले. येरवड्यातील महिला कारागृहात ३०० महिला आहेत. त्यातील बहुसंख्य महिला न्यायाधीन (कच्चे कैदी) आहेत. गंभीर गुन्ह्यात त्यांना अद्याप शिक्षा सुनावण्यात आली नाही. शिक्षा सुनावलेल्या ३० ते २५ महिला कारागृहात आहे. महिला कैद्यांसाठी शेती, तसेच विविध पारंपरिक व्यवसाय आहेत. तेथे खुले कारागृह सुरू करण्यात येणार आहे. येरवड्यात महिलांसाठी खुले कारागृह सुरू झाल्यानंतर देशातील किंबहुना आशिया खंडातील पहिले कारागृह ठरणार आहे.

### खुले कारागृह म्हणजे काय?

» जन्मठेपेसह गंभीर गुन्ह्यात शिक्षा सुनावलेल्या कैद्यांना खुल्या कारागृहात ठेवण्यात येते. येरवडा कारागृहात पुरुष कैद्यांसाठी खुले कारागृह आहे. खुल्या कारागृहात बराकी नसतात. शिक्षेचा कालावधी पूर्ण होईपर्यंत कैद्यांना भिंतीआड रहावे लागत नाही. खुल्या कारागृहात वसाहती असतात. तेथे शेती असते. तेथे फारसा बंदोबस्त नसतो. नियमित हजेरी देण्याशिवाय अन्य बंधने कैद्यांवर नसतात. खुल्या वातावरणात कैदी शेती करतात. शेतीत लागवड करणारा भाजीपाला कारागृहात पुरविण्यात येतो.

# पुणे विमानतळाबाबत उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय!

## विस्तार करणे ही सर्वस्वी सरकारची जबाबदारी

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे विमानतळावरील हवाई दलाचा तळ दुसरीकडे हलवावा आणि विमानतळाचा विस्तार करावा, अशी मागणी करणारी जनहित याचिका उच्च न्यायालयाने दाखल करून घेण्यास नकार दिला. विमानतळ उभारणे अथवा त्याचा विस्तार करणे ही सर्वस्वी सरकारची जबाबदारी आहे, असे मत नोंदवून न्यायालयाने यात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. अनिरुद्ध देशपांडे यांनी ही जनहित याचिका दाखल केली होती. यावर नुकतीच मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायाधीश अरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.




पुण्यातील लोहगाव येथील नागरी विमानतळ हवाई दलाच्या तळामध्ये आहे. हवाई दलाचा तळ दुसरीकडे हलवून विमानतळाचा विस्तार करावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. खंडपीठाने ही याचिका दाखल करून घेण्यास नकार दिला. खंडपीठ म्हणाले, की पुणे विमानतळाचे ठिकाण आणि हवाई दलाचा तळ कुठे असावा, या सरकारच्या कार्यकक्षेतील बाबी आहेत. त्यात न्यायालयाने हस्तक्षेप करणे योग्य नाही. कुठे विमानतळ करायचा आणि कुठे करायचा नाही, हा निर्णय सर्वस्वी सरकारने घ्यावा. हा संपूर्ण निर्णय सरकारचा असेल. सरकारच्या निर्णयामुळे एखाद्या व्यक्तीच्या मूलभूत हक्कावर गदा येत असेल तरच आम्ही हस्तक्षेप करू. तुम्हाला या प्रकरणी दाद मागण्यासाठी इतर यंत्रणा आहेत. हवाई दलाचा तळ दुसरीकडे हलवण्याबाबत विचार करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याबाबत केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाला निर्देश द्यावेत, अशी मागणीही याचिकेत करण्यात आली होती. उच्च न्यायालयाने यास नकार देत याचिकाकर्त्याला प्रशासकीय पातळीवर याबाबत पाठपुरावा करण्याची सूचना केली. त्यानंतर याचिकाकर्त्यांने याचिका मागे घेतली.

नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी प्रशासनाने जागा ताब्यात घेतल्याची माहिती याचिकाकर्त्याला मिळाली होती. मात्र, त्यानंतर काहीच घडले नाही. या प्रकरणी याचिकाकर्त्यांने संबंधित सरकारी यंत्रणांसमोर सादरीकरणही केले होते. नवीन विमानतळाच्या उभारणीची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी आणि हवाई दलाचा तळ दुसरीकडे हलवावा, अशी मागणी यंत्रणांकडे करण्यात आली होती. त्याला प्रतिसाद न मिळाल्याने उच्च न्यायालयात याचिका करण्यात आली होती.